जबलपूर सोडून आम्ही दरभंग्याला आलो. मुले हुषार असल्याने.14 व्या वर्षीच मॅाट्रिक झाली. दोन्ही मुलीनां स्कॉलरशिप मिळाली मुलाला मात्र वडिलांचा पगार जास्त म्हणून 100 रू व उत्तम रीतिने पास झाल्याच सर्टिफिकेट मिळाले. दरभंग्याला गेल्यावर हयानी फुकटांत ज्योतिष पहाण्यास सुरवात केली पीएचडी जे विधार्थी आले त्यांच्या बरोबर ज्योतिषाचा अभ्यास केला. तसा अभ्यास आधी पासून होताच तो आता शास्त्रशुध्द होऊ लागला त्यांचे दोन तीन विधार्थी नेपाळमध्ये जाऊन भविष्य वर्तवू लागले. बिहार व नेपाळ हयांच्या सीमा एकदुस-याला लागून. दरभंग्यालहून रक्सोलला व तिथून नेपाळला ताबडतोब जाता येई. पटणा कांठमांडू विमानसेवा होती. हयानी 58 वर्ष पूर्ण झाल्यावर रिटायरमेंट घेतली अगदी कमी पेन्शन होती कारण 15 वर्षेच सर्व्हिस झालेली. पण पुढे कायदा बदलत जाऊन पेन्शन चांगली मिळायला लागली.

---------------------------------------------------------------------